महासागर
गुरूवार, दि. 24 ऑक्टोंबर 2024
अमरावती
पान 3

# माजी आ.अभिजीत अडसुळ आज दाखल करणार उमेदवारी

## शिवसेनेचे आज शक्तीप्रदर्शन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.23)**- दर्यापूर मतदारसंघाचे माजी आमदार अभिजीत अडसुळ पुन्हा एकदा धनुष्यबाणावर निवडणूक लढत आहेत. याकरिता उद्या बुधवार (23 ऑक्टोंबर) रोजी उमेदवारी दाखल करणार आहे.

सकाळी 10 वाजता माहेश्वरी भवन ते दर्यापूर तहसिल कार्यालय अशी



शिवसेनेकडून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात शक्तीप्रदर्शन करणार असून शिवसेनेचे अनेक मोठे नेते यावेळी उपस्थित राहणार आहे. शिवसैनिकांनी मोठ्याप्रमाणात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अखेर सुनिल खराटेंनाच शिवसेनेची उमेदवारी

## उध्दव ठाकरेंनी स्वत: दिला एबी फार्म

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.23)** - बडनेरा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून शिवसेनेच्या (उबाठा) उमेदवारीवर सुरु असलेला पेच अखेर संपला. शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल खराटे यांना शिवसेनेची उमेदवारी घोषीत करण्यात आली. शिवसेना प्रमुख उध्दव ठाकरे यांनी स्वत: त्यांना एबी फार्म दिला. यावेळी शिवसेना नेत्या सुषमा अंधारे, मिलिंद नार्वेकर, माजी खासदार अनंत गुढे, माजी जि.प. सदस्य सुधीर सुर्यवंशी, शिवसेना महानगर प्रमुख पराग गुडधे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



दिवंगत माजी आमदार संजय बंड यांच्या पत्नी प्रिती बंड यांनी गेल्या निवडणूकीमध्ये आ.रवी राणांना निकरीची लढत दिली होती. त्यामूळे प्रिती बंड यांना पुन्हा एकदा उमेदवारी मिळावी अशी मागणी काही शिवसैनिकांकडून होत होती, दुसरीकडे 10 वर्षापासून आपल्याला बडनेरा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी याकरिता प्रयत्न करित असलेले शिवसेना जिल्हाप्रमुख सुनिल खराटे यांनी बडनेरा येथील शिवसेनेच्या उमेदवारीवर दावा केला होता. उमेदवारीसाठी काट्याची टक्कर सुरु असताना अखेर सुनिल खराटे यांनी बाजी मारत उमेदवारीवर मोहोर उमटविली. यावेळी ते मातोश्रीवर ठाण मांडून होते. उमेदवारी मिळाल्यावर ते एबी फार्म घेवूनच अमरावतीकरिता निघाले.

### बंड यांच्या निवासस्थानी एकवटले कार्यकर्ते



प्रिती बंड यांना उमेदवारी मिळाली नसल्याची माहिती मिळताच त्यांच्या निवासस्थानी त्यांचे समर्थक शिवसैनिक एकवटले. यावेळी संजय भाऊ अमर रहे, प्रिती ताई आगे बढो असे नारेबाजी करण्यात आली. येत्या दोन दिवसात काहीतरी निर्णय घेवू अशा भावनाही यावेळी बंड समर्थकांनी व्यक्त केल्या.

### मी उध्दव साहेबांसोबतच



मला उमेदवारी का देण्यात आली नाही, हे अनाकलणीय आहे. गेल्या तीन वर्षापासून मी तयारीला लागली होती. पैशांने पुरणार नाही, अश्या वावड्या उठविणाऱ्यांचे तोंड बंद करण्याकरिता पैशांचीही जुळवा जुळव करण्यात आली होती, उध्दव साहेबांनी मला उमेदवारी मिळण्याचा विश्वास दिला होता. परंतू मला उमेदवारी दिली नाही. बंड कुटूंब 40 वर्षापासून शिवसेनेशी जुळलेले होते आणि पुढेही शिवसेनेशीच जुळून राहील. उध्दव साहेब पुढचा जो आदेश देतील तो मला मान्य राहील.

# माजी आ.रमेश बुंदिलेंचा भाजप ला रामराम

## युवा स्वाभिमान पार्टीत प्रवेश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 23)** - दर्यापूर विधानसभा मतदारसंघातून 2014 मध्ये भाजपाचे उमेदवार म्हणून विजयी झालेले रमेश बुंदिले यांनी भाजपला रामराम करत आज आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पार्टीत प्रवेश केला. विशेष म्हणजे दर्यापूर विधानसभा मतदारसंघात युवा स्वाभिमान पार्टीचे उमेदवार म्हणून रमेश बुंदिले हे निवडणूक रिंगणात उतरणार आहेत.



अनुसूचित जातीसाठी राखीव असणाऱ्या दर्यापूर विधानसभा मतदारसंघात महायुतीतून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार म्हणून अभिजीत अडसूळ यांचं नाव जाहीर झालय. आमदार रवी राणा यांचा युवा स्वाभिमान पक्ष हा महायुतीत असला तरी अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात माजी आमदार रमेश बुंदिले हे निवडणूक रिंगणात उतरणार आहेत.

# बाजारात विक्रीसाठी आणलेले दोन कासव जप्त

## वरुड येथे वनविभागाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.23)** - येथील बाजारात विक्रीसाठी आणलेले दोन कासव वनविभागाने जप्त केले आहे. ही कारवाई बुधवारी(दि.23) करण्यात आली.

वरुड येथील मटन मार्केटला लागून असलेल्या बाजारामध्ये कासव विक्रीसाठी आणल्याची माहिती वनविभागाला मिळाली होती. वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे यांचे मार्गदर्शनाखाली वर्तुळ अधिकारी धनंजय भटकर व त्यांच्या पथकाने बाजारपेठेत धाड टाकली. दरम्यान एक इसम कासव विक्रीसाठी घेऊन आल्याचे आढळून आले. रमेश बाबुराव कावनपुरे (वरुड) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून वनविभागाने कासव जप्त करून त्याला चौकशीसाठी वनविभागाच्या शहापूर कार्यालयात घेऊन गेले होते. मंगळवारी या प्रकरणी रमेश बाबुराव कावनपुरे यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचा पुढील तपास सहाय्यक वनसंरक्षक डॉ.मयूर भैलुमे, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्तुळ अधिकारी धनंजय भटकर करित आहेत.

# रिव्हॉल्वर बाळगणाऱ्या तिघांना अटक

## शहर गुन्हेशाखेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 23)** - गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेऊन, त्यांच्याजवळील रिव्हाल्वर व जिवंत काढतोसजप्त केली. सुरज शकंर दुबे (रा.लोनटेके, अमरावती), सुरज ब्रिजेश विश्वकर्मा (रा.बजरंग टेकडी, साहु बाग, अमरावती) व मोहम्मद शोऐब उर्फ बिल्ली मोहम्मद सलीम (रा.छाया नगर, अमरावती) अशी आरोपींची नावे आहे. त्याच्या ताब्यातून एक पिस्टल व 3 जिवंत काडतुस असा एकुण 23 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



विधानसभा निवडणूकीच्या अनुषगांने पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या आदेशानुसार, अमरावती शहरातील सराईत गुन्हेगांवर आळा बसावा तसेच त्यांचेवर योग्य ती प्रतिबंध कार्यवाही व्हावी. अवैधरित्या शस्त्र बाळगणार्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान गुप्त माहितीवरून ही कार्यवाही केली आहे. गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार हे आयुक्तालय हद्दीत गुन्हेगार चेकिंग, तडीपार इसम चेकिंग तसेच फरार व पाहीजे आरोपींचा शोध घेत होते. दरम्यान गुप्त माहितीवरून पोलिसांनी लोनटेके येथील जिल्हा परिषद शाळेसमोर जाऊन पाहणी केली असता, तेथे एक इसम हा कमरेला पिस्तुल लावुन फिरत होता. दरम्यान पोलिसांनी सुरज शकंर दुबे, सुरज ब्रिजेश विश्वकर्मा व मोहम्मद शोऐब उर्फ बिल्ली मोहम्मद सलीम यांना घटनास्थळारून ताब्यात घेतले. यापैकी एकाजवळील एक पिस्टल व 3 जिवंत काडतुस असा मुद्देमाल जप्त केला. या आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात कलम 3/25 आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त कल्पना बारावकर, सागर पाटील, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर यांच्या नेतृत्वाखाली एपीआय योगेश इंगळे, सहायक पोलिस उपनिरीक्षक बबलु येवतीकर, पोलीस अंमलदार नंदकिशोर अबुलकर, मनोज ठोसर, शेखर रामटेके, विशाल वाकपांजर, प्रतिक यादव यांनी केली आहे. तसेच 22 ऑक्टोबर रोजी गुन्हेशाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तडीपार साहिल उर्फ गोलु अंभोरे (रा.महादेव खोरी, अमरावती) याला सुदंरलाल चौकातून ताब्यात घेतले. त्याच्याविरूध्द फ्रेजरपुरा ठाण्यात कलम 142 महाराष्ट्र पोलिस कायद्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

# मोर्शीत गांजा तस्कराला अटक

## 2600 रुपयांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 23)** - मोर्शी पोलिसांनी सिंभोरा चौक परिसरातील एका दुकानातून 2 हजार 600 रुपये किमंतीचा गांजा जप्त केला. ही कारवाई मंगळवारी मोर्शी पोलिसांनी केली. याप्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अवैध धंदे करणार्यांविरूध्द कार्यवाही करण्याबाबत पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांना निर्देशीत केले होते. त्यानुसार 22 ऑक्टोबर रोजी मोर्शीचे पोलीस निरिक्षक नितीन देशमुख यांच्या अधिनस्त अधिकारी व अंमलदार यांनीगोपनिय माहीतीवरून सिंभोरा चौक येथील एका दुकानावर गांजा विक्री करणार्या करणार्या ईसमावर छापा टाकुन त्याच्या ताब्यातुन 2600 रूपयांचा गांजा माल जप्त केला. राजपत्रित अधिकारी नायब तहसिलदार चारूदत्त पाटील यांच्या समक्ष हा गांजा जप्त करून आरोपीविरूध्द मोर्शी ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनांत पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक विशाल रोकडे, अमोल बुरकुल, आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार स्वप्नील बायस्कर, छत्रपती करपते निखिल विघे यांनी केली असुन पुढील तपास पीएसआय अमोल बुरकुल हे करत आहे.

# दुर्मीळ झाली पनोळी



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, (दि.23)**- दिवाळीत 'लक्ष्मी' बनविण्याऱ्या केरसुणी कारागिरांचे हात लक्ष्मीविनाच अचलपुर, अंजनगाव तालुक्यातील येथील बोटावर मोजणारी कुटुंब केरसुणी बनविण्याचे काम करीत आहेत. ही कुटुंब गेल्या कितेक पिढ्यांपासून केरसुणी तयार करण्याच्या व्यावसायात आहे. मात्र, दिवसरात्र मेहनत करून एक कुटुंब 50 ते 60 केरसुणी तयार करतात. एका केरसुणीला बाजारात 25 ते 30 दर मिळतो. मात्र, केरसुणी तयार करण्यासाठी लागणारे साहित्य यांचे दर आकाशाला भिडले असल्याने त्यांच्या पदरात काही पडत नाही आहे.

स्वच्छ आणि प्रसन्न असलेल्या घरात लक्ष्मीचे वास्तव्य असते, अशी श्रद्धा असल्याने दिवाळसणात आपल्याकडे केरसुणी अर्थात झाडूची पूजा केली जाते. धनत्रयोदशीला झाडूची खरेदी करून लक्ष्मीपूजनाला त्याची रीतसर पूजा केल्या जाते. मात्र, यंदा केरसुणी बनवण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या भावात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे केरसुणी बनवणारे हात मात्र लक्ष्मीविनाच राहात आहेत. केरसुणी बनवणारे शेकडो पारंपरिक व्यावसायिक 'या धंद्यात आता राम राहिला नाही', अशी प्रतिक्रिया ते देत आहेत. तर, दुसरीकडे अंगवळणी पडलेला हा व्यवसाय असल्याने कमी फायद्यात असूनही केरसुणी बनवण्याचे काम सुरूच आहे.



### बाजारात मागणी नसल्याने कारागिर

बाहेर राज्यातून आणावे लागते केरसुणीचे साहित्य -केरसुणी बनविण्यासाठी पनोळी (साहित्य) ही दुसऱ्या राज्यातून आणावी लागते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शिंदीची झाडे दुर्मीळ झाल्याने पनोळी मिळत नाहीत. केरसुणी बांधण्यासाठी लागणारी दोरी अन्य साहित्याची किमती वाढल्याने एक केरसुणी तयार करण्यासाठी 15 ते 20 रुपये खर्च येत आहे. तसेच बाजारात विक्रीसाठी जाण्यासाठी लागणारा खर्च वेगळाच आहे. तर बाजारात या केरसुणीला प्रत्येकी 25 ते 30 रुपये दर मिळत आहे. यामुळे ज्या केरसुणीची दिवाळीत लक्ष्मी म्हणून पूजा केली जाते, तीच लक्ष्मी केरसुणी बनविणाराच्या घरात नाही, अशी स्थिती आहे.केरसुणी बनविणारे कुटुंबांचा हाच एकमेव व्यवसाय आहे. दोन ते तीन पिढ्यांपासून हे लोक याच व्यवसायात गुंतले आहेत. मात्र, अनेकांच्या घराचे पत्रे देखील बदलले नाहीत. पावसाळ्यात अनेकांच्या घरात पावसाचे पाणी पडते तर, काही कुटुंबांचे वास्तव्य अजूनही झोपडीतच आहे.

# आज यशोमती ठाकूर दाखल करणार नामांकन

## आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आ.विनेश फोगाटसह दिग्गजांची राहणार उपस्थिती

### तिवसा येथे नामांकन रॅली व जाहीर सभा द्वारा शक्तीप्रदर्शन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती(दि.23)** - तिवसा विधानसभा मतदारसंघाकरिता महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार म्हणून यशोमती ठाकूर आपला उमेदवारी अर्ज उद्या गुरुवार दि.24 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता दाखल करणार आहेत. महाविकास आघाडीमध्ये समाविष्ट सर्वच पक्षाच्या स्थानिक नेत्यांसह हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत यशोमती ठाकूर शक्तिप्रदर्शन करणार आहे.

### चौथ्यांदा विजय मिळण्याचा विश्वास

तब्बल तीन वेळा काँग्रेस पक्षाला तिवसा विधानसभा मतदार संघातून विजय मिळवून दिलेल्या यशोमती ठाकूर ह्या चौथ्यांदा देखील मोठ्या मताधिक्यांनी निवडून येतील असा कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांमध्ये विश्वास आहे. काँग्रेस, शिवसेना उबाठा गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या वतीने महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या विजयाकरिता प्रयत्न होत असून आजच्या होणाऱ्या शक्तिप्रदर्शनातुन यशोमती ठाकुर यांच्या विजयाचे चित्र स्पष्ट होणार आहे.

आपला नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी तिवसा येथील समर्थ आडकुजी महाराज नगर सातारगाव रोड येथे भव्य जाहीर सभा होणार असून या जाहीर सभेला दिग्गजांच्या उपस्थितीत लोकनेत्या यशोमती ठाकूर हजारो कार्यकर्त्यांसह मतदारांना संबोधित करतील. प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आमदार विनेश फोगाट, मध्यप्रदेशचे माजी मंत्री सुखदेव पांसे, खा.संजय देशमुख, खा.बळवंत वानखडे, खा.अमर काळे, माजी मंत्री अनिल देशमुख, आमदार धिरज लिंगाडे यांच्यासह स्थानिक प्रमुख नेत्यांची उपस्थित राहणार आहे.

आपल्या हक्काच्या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करणारी 'ताई' म्हणून जिल्ह्यात सुपरिचित असलेल्या यशोमती ठाकुर यांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी जाहीर करताच त्यांच्या चाहत्यांमध्ये कमालीचा उत्साह दिसून आला. त्यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून त्यांच्या उमेदवारीने तिवसा मतदार संघात नवचैतन्य निर्माण झाले आहे. विकासाभिमुख, कणखर नेता म्हणून जिल्ह्यात नावलौकिक मिळविलेल्या यशोमती ठाकूर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जिल्ह्यातील हजारो कार्यकर्ते उपस्थिती लावून शक्तिप्रदर्शन करणार आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# आपली निष्क्रीयता लपविण्याकरिता आ.राणा किराणा वाटतात!



- बडनेरा मतदारसंघातील विकासाचा अनुशेष भरुन काढायचा आहे
- नितीन कदम यांची 'दै.महासागर' शी खास बातचीत

— रोहित गासे —

*अमरावती,( दि.23 )-राजकारण करणे हा माझा पिंड नाही, संघटनेच्या माध्यमातून बडनेरा मतदारसंघात फिरत असताना विकासाच्या दृष्टीने हा मतदारसंघ अत्यंत मागासलेला असल्याचे मला जाणवले. येथे तिनवेळा आमदार राहीलेले रवी राणा हे फक्त आपली निष्क्रीयता लपविण्याकरिता मतदारसंघात किराणा वाटून लोकांना लाचार करतात, असा आरोप करत बडनेरा मतदारसंघातील विकासाचा अनुशेष भरुन काढायचा असल्याने जनताच मला या निवडणूकीमध्ये उभे करत असल्याचे संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा समाजसेवक नितीन कदम यांनी दै.महासागर ला दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान सांगितले. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना अनेक खुलासे आहे.*

**प्रश्न-तुम्ही कोणत्या पक्षाची उमेदवारी घेवून लढणार आहात?**

**कदम-** आम्हाला एका पक्षाची ऑफर आहे, जी अद्याप गुलदस्त्यात राहू द्या!, परंतू आम्ही अजूनही कोणत्या पक्षाच्या भरवश्यावर नाही. आम्हाला कोणती उमेदवारी नाही मिळाली, तरी आमची संकल्प शेतकरी संघटना जिंदाबाद आहे. आम्ही संघटनेचा झेंडा खांद्यावर घेवून अपक्ष लढू.

**प्रश्न-बडनेरा मतदारसंघात तुम्हाला विकासाचा काय अनुशेष वाटतो?**

**कदम-** बडनेरा मतदारसंघात सिंचन, बंधारे, पांदन रस्ते, आरोग्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था आणि सर्वात महत्वाचे म्हणजे रोजगाराचा येथे अनुशेष आहे. बेरोजगारीमूळे या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली आहे. विद्यमान आमदारांनी येथील विजय मील तर सुरु केलीच नाही, उलट मील ची 37 एकर जागा आपल्या घश्यात घातली.

**प्रश्न-तुमची उमेदवारी काँग्रेसला बंडखोरी असेल का?**

**कदम-**अजिबात नाही, मी काँग्रेसमध्ये कोणत्या पदावर कधीच नव्हतो, माझी विचारधारा ही काँग्रेसी आहे, आणि राहील. माझी उमेदवारी काँग्रेस विरुध्द कधीच नव्हती, ती स्थानिक आमदाराविरुध्द मला जनतेने उभे केले आहे.

**प्रश्न-तुम्हाला विजयाची शाश्वती किती?**

**कदम-**बडनेरा मतदारसंघात मी कोणत्याही पदावर नसताना अनेक विकासकामे केली, बंधाऱ्यांचे निर्माण केले. गावागावात अनेकांना निस्वार्थ मदत केली. त्यामूळे आज गावागावात नितीन कदम यांचे नाव प्रत्येकाच्या तोंडावर आहे. त्यामूळे मला विजयाची शाश्वती आहे.

**प्रश्न-आपण विद्यमान आमदारांशी कोणत्या मुद्द्यावर लढणार?**

**कदम-**राणांच्या एकाच घरात आमदार आणि खासदारकी होती. तरी नांदगाव पेठ एमआयडीसीमध्ये नविन कोणते कारखाने आले नाही, जे कारखाने होते, ते सुध्दा माजी खासदारांच्या कार्यकर्त्यांकडून होत खंडणीवसुलीमूळे त्रस्त होवून निघून जाण्याच्या तयारीत आहे. वॅगन फॅक्टरीमध्ये 75 टक्के स्थानिक लोकांना कामाकरिता प्राधान्य हवे होते, तेथे 75 टक्के युपी आणि बिहारचे मजूर आणि 25 टक्के स्थानिक कामगार आहे. हे सर्व चित्र मला बदलायचे आहे, या मुद्द्यावर मी लढणार आहे.

# मोर्शी विधानसभा मतदार संघातील उमेदवारीचा पेच कायम

**मविआ ला बंडखोरांची तर आमदाराला तिकीट कापण्याची भीती**






**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.23)** - विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. महाविकास आघाडीत उमेदवारीवरून रंगलेली स्पर्धा आणखी तीव्र झाली आहे, तर महायुतीत उमेदवारीवरून स्पर्धा दिसत नसली तरी विद्यमान आमदारांचा पत्ता कट होण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडीतील इच्छुकांची संख्या तर महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार देवेंद्र भुयार यांना होणाऱ्या विरोधामुळे धाकधुक वाढली आहे. लोकसभा निवडणुकीतील विजयामुळे महाविकास आघाडीचे मनोबल उंचावले आहे. त्यामुळेच महायुतीच्या तुलनेत उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या महाविकास आघाडी त्यातही राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाकडे सर्वाधिक आहे. वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघावर आघाडीतील काँग्रेस, शिवसेना (उबाठा) तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे नावे गेले आहे. यामुळे जागा वाटपाचा तिढा अजूनही सुटलेला नाही. आघाडीकडे शिवसेना तसेच काँग्रेसच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेसकडे इच्छुकांची लांबलचक यादी आहे. महायुतीत जागा वाटपाचे जवळपास निश्चित आहे. विद्यमान आमदार देवेंद्र भुयार यांनाच उमेदवारी जाईल अशी चर्चा आहे, परंतु भाजपाला प्रचंड विरोध आहे, त्यामुळे कदाचित आमदाराची उमेदवारी रद्द होऊन भाजपाला उमेदवारी मिळेल का असा सूर उमटु लागला आहे. आघाडीच्या तुलनेत युतीत उमेदवारीची स्पर्धा कमी दिसत असली तरी अंतर्गत नाराजी मोठ्या प्रमाणात असल्याची चर्चा सुरू आहे. यामुळे वरुड,मोर्शी मतदारसंघात विद्यमान आमदारांना डच्चू देण्याची तयारी भाजपची आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या इच्छुकांची संख्या पाहता उमेदवारीवरून मोठमोठे वादंग होण्याची शक्यता आहे. त्यामूळे महाविकास आघाडीला बंडखोराची तर महायुतीला आमदाराची भीती आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे जरूड ग्रा.पं.ला भेट

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.23 )** - येथून जवळच असलेल्या जरूड ग्रामपंचायतला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संचिता मोहोपात्रा यांनी मंगळवारी अचानक भेट दिली. यातील विकास कामांची पाहणी करीत गावाला आतापर्यंत मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांनी कौतुक केले.



तालुक्यातील सर्वात मोठे गाव म्हणून जरूड ग्रामपंचायतचे नाव घेतल्या जाते. या गावाला सन 2019 पासून माझी वसुंधरा अभियानात सलग चार वेळा व अमरावती विभागातून सतत तीन वेळा दोन कोटीचा पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय अटल भूजल ग्राम समृद्धी अभियानात जिल्ह्यातून प्रथम व महाराष्ट्र राज्यातून व्दितीय एक कोटी रुपयाचा पुरस्कार तसेच स्मार्ट ग्राम आर.आर.आबा दहा लाखांचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यामुळे या गावाची भेट घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी महापात्रा यांनी त्यांचे कौतुक केले. भेटीदरम्यान जरूड गावाचे माजी सैनिक तथा माजी सरपंच सुधाकर मानकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहोपात्रा यांचे रोपटे देऊन स्वागत केले. त्यांना गावातील विविध कामांची माहिती दिली दरम्यान लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नर्सरी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ऑक्सिजन, मोक्षधाम स्मृती उद्यान बहादा रोड जरुड, नदीचे खोलीकरण व जलसंधारण, कोल्हापुरी बंधारे, जि.प.शाळा, ॲलोपॅथिक दवाखाना, पशुसंवर्धन दवाखाना इत्यादी ठिकाणची पाहणी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केली. या दौऱ्यासाठी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, वरुड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सतीश देशमुख, जरूड ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी संजय दांदडे, रोजगार सेवक उमेश मिरकुटे, नंदकिशोर कांबळे, ग्रामपंचायत कर्मचारी शुभम धर्मे, रोशन पडोळे, राजीव दारोकर, सतीश वसुले यांची उपस्थिती होती.

## खर्च निरीक्षकांशी संपर्क साधण्याचे आवाहन

**अमरावती** - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी दोन खर्च निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. खर्च निरीक्षक व्येंकन्ना तेजावथ आणि उमा माहेश्वरी यांची जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीतील खर्चावर देखरेख राहणार आहेत. निवडणूक खर्चाबाबत तक्रारी, समस्या असल्यास खर्च निरीक्षकांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. खर्च निरीक्षक व्येंकन्ना तेजावथ यांच्याकडे 36 - धामणगाव रेल्वे, 37 - बडनेरा, 38- अमरावती, 39 - तिवसा आणि श्रीमती उमा माहेश्वरी यांच्याकडे 40 - दर्यापूर, 41 -मेळघाट, 42 - अचलपूर, 43 - मोर्शी या मतदारसंघातील खर्च निरीक्षकाची जबाबदारी सोपविली आहे.

# अमोल घुरडे राज्य सरपंच सेवा महासंघाच्या संघटक पदी

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.23 )**- महाराष्ट्र राज्य सरपंच सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे यांनी अमोल घुरडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याची दखल घेत, त्यांनी अगदी कमी वयामध्ये भूषवलेली सर्व स्तरावरील पदे व त्यांची काम करण्याची पद्धत पाहता त्यांची महाराष्ट्र राज्य सरपंच सेवा महासंघाच्या राज्य संघटक पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी सर्वांच्या उपस्थितीत पुरुषोत्तम घोगरे यांनी नियुक्तीपत्र, सन्मानपत्र व संघाचे ओळखपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



यावेळी प्रामुख्याने भुजंगराव कोकाटे, रमेश सावळे, निलेश घोडेराव, धर्मराज बारबदे, कैलास शिरसाट, दीपक नवलकर, डी.बी.वानखडे, मनोज लहूपंचांग, मुजेवार, अजय डिके, खुर्शीद, साहेबराव सदांशिव, स्वराज वानखडे, विजय दामले, पवार भाऊ, गोपाल खलोकर, योगेश भगत तथा असंख्य मंडळी उपस्थित होती. अमोल घुरडे यांच्या निवडीने त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन तथा कौतुक होत आहे.

# शहर वाहतुकीत मंगळवारी तात्पुरता बदल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.23 )** - बडनेरा-37 विधानसभा मतदार संघातील उमेदवार यांना नामांकन अर्ज दाखल करण्याची मुदत दि.29 ऑक्टोबर 2024 पर्यंत आहे. बडनेरा-37 विधानसभा मतदार संघाचे नामांकन अर्ज जुने तहसिल कार्यालय, मुख्य पोस्ट ऑफीस जवळ, अमरावती या ठिकाणी स्विकारण्यात येणार आहे. या कार्यालया समोरील मार्ग अत्यंत गजबजलेला असतो. ही बाब लक्षात घेता या दिवशी शहर वाहतुकीत बदल करण्यात आला आहे, अशी माहिती अमरावती शहर वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी दिली आहे. तात्पुरत्या अधिसूचनेनुसार यादिवशी मुख्य पोस्ट



ऑफीस, अमरावती ते तहसील कार्यालयाच्या भिंती पावेतो येणारी सर्व प्रकारची वाहतूक इतर मार्गाने वळविण्यात आली आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करून पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## असे राहील पर्यायी मार्ग

वाहन चालकांनी श्याम चौक ते साबनपुरा व बापट चौक ते जवाहर गेटकडे जाणाऱ्या मार्गाचा अवलंब करतील. मुख्य पोस्ट ऑफीस, अमरावती ते तहसील कार्यालय या मार्गावरील आस्थापनाधारकांनी आपली वाहने सकाळी 10 वाजेपूर्वी आस्थापनाकरीता आरक्षित पार्कींगमध्ये ठेवावी. सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेदरम्यान प्रवेश बंदी असलेल्या मार्गावरून आपणास वाहन ने-आण करता येणार नाही. या कालावधीत आपणास वाहनाचे काम असल्यास आपण प्रतिबंधित मार्गाच्या बाहेर आपली वाहने अन्य सुरक्षित ठिकाणी पार्क करावी. या अधिसूचनांचे जो कोणी वाहनचालक उल्लंघन करेल, त्यांचेविरुद्ध मोटार वाहन कायद्याप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

# दिवाळीच्या फराळाला महागाईचा तडका

## सर्वच वस्तुंच्या किंमतीत वाढ

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.23 )** - सध्याच्या वाढत्या महागाईमुळे यंदा दिवाळीचा तयार फराळही महागला आहे. दिवाळीचे फराळ तयार करताना लागणारे साहित्य म्हणजे डाळ, तेल, साखर या सर्वच वस्तुंच्या किंमती वाढल्याने तयार फराळाच्या दरामध्येही वाढ झाली आहे.

सध्याच्या वाढत्या महागाईमुळे यंदा दिवाळीचा तयार फराळही महागला आहे.



दिवाळीचे फराळ तयार करताना लागणारे साहित्य म्हणजे डाळ, तेल, साखर या सर्वच वस्तुंच्या किंमती वाढल्यामुळे तयार फराळाच्या दरामध्येही वाढ झाली आहे. तसेच ही वाढ आता ग्राहकांच्या खिशावर अधिक भार टाकणार असल्याचे समोर आले आहे.

वर्षभरात लोकं दिवाळीची आतुरतेने वाट पाहत असतात. दिवाळी म्हटलं की, कुटुंबातील लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना फराळाची उत्सुकता लागलेली असते. दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आल्याने फराळ बनविण्यासाठी गृहिणी तसेच फराळ विक्रेत्यांची लगबग सुरू झाली आहे. चिवडा, शेव, चकली, विविध प्रकारचे लाडू, शंकरपाळे, करंज्या आदी बनवण्यासाठी गृहिणींनी शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवसांचे औचित्य साधून कच्च्या मालाची खरेदी केली. मात्र त्याचे दर वाढल्याने फराळाला महागाईचा तडका बसल्याचे पाहायला मिळत आहे. दिवाळीला सुरुवात होणार आहे.

### कच्चा माल महागल्याने फराळाचे दर कडाडले

जेमतेम आठ दिवस राहिल्याने फराळ बनविण्याचे नियोजन गृहिणींनी सुरू केले आहे. हा फराळ बनविण्यासाठी लागणारे साहित्य बेसन, तांदळाचे पीठ, साखर, पिठीसाखर, साजूक तूप, तेल, भाजणी, सुकामेवा, सुके खोबरे आदी साहित्याची खरेदी सुरू झाली आहे.मात्र बाजारात या वस्तुंची मागणी वाढल्याने त्यांच्या किंमती देखील यंदा वाढल्या आहेत. सध्या चणाडाळ, जिरे, धणे, तेल आणि काजू यांच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे. काजूचे दर 150 ते 200 प्रतिकिलो रुपयांनी वाढले आहेत. तेलाच्या किंमतीमध्येही प्रतिलिटर मागे 25 ते 30 रुपयांची वाढ झाली असल्याचे किराणा विक्रेत्यांनी सांगितले आहे. तसेच कच्चा माल महागल्याने फराळाचे दर वाढविण्या शिवाय पर्याय नसल्याचे काही फराळ विक्रेत्यांनी सांगितले आहे. त्यामुळे यंदाच्या वर्षाचे गृहिणींचे दिवाळीचे बजेट कोलमडले आहे.

# दुचाकींची समोरासमोर धडक; दोन ठार

**अमरावती-** बनोडा शहिद पोलिस स्टेशन हद्दीतील माणिकपुर फाट्याजवळ दोन दुचाकींत झालेल्या अपघातात दोन्ही दुचाकीचालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. सदर घटना मंगळवारी (ता. 22) सायंकाळी 6.30 वाजताच्या सुमारास घडली. पुरूषोत्तम भासकवरे (55, रा. गोरेगाव) व जगन्नाथ ठेपे (52, रा. बेनोडा ) अशी अपघातातील मृतकाची नावे आहेत. पोलिस सुत्रानुसार, मंगळवार (दि.22) सायंकाळी 6.30 वाजताच्या सुमारास बेनोड्याकडून मोर्शीकडे जाणाऱ्या एमएच 27 बीएच 3768 क्रमांकाच्या दुचाकीला मोर्शीकडून वरूड मार्गे येत असलेल्या एमएच 27 जे 2721 क्रमांकाच्या दुचाकीने समोरासमोर जबर धडक झाली. माणिकपुर फाट्याजवळ घडलेल्या या अपघातात दोन्ही दुचाकीवरील चालक हवेत फेकले गेले व रस्यावर आदळले. दोघांच्याही डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघात होताच नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली व या घटनेची माहिती बेनोडा पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व दोन्ही मृतकांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास बेनोडा पोलिस करीत आहेत.

## जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**

**श्री. एस. एच. खाडे यांचे न्यायालयात 9 वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, अमरावती.**

किरकोळ अर्ज / 1676/2024
मेघा धनंजय मेहरे +04 वि. निरंक
पुढिल तारिख 18-10-2024

बनाम - सर्वत्र लोकांना

अर्जदार:- 1) मेघा धनंजय मेहरे, वय - 46 वर्षे, व्यवसाय - घरकाम, पत्ता- रा. राम नगर, नेर, ता. नेर, जि. यवतमाळ, 2) ऋषीकेश धनंजय मेहरे, वय-20 वर्ष, व्यवसाय - व्यापार रा. राम नगर, नेर, ता. नेर, जि. यवतमाळ, 3) हेमलता मंगेश मेहरे, वय-46 वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा. देवत्त नगर, एच.व्ही.पी.एम. अमरावती, ता. जि. अमरावती, 4) मोहिनी मंगेश मेहरे, वय-24 वर्षे, व्यवसाय-शिक्षण, रा. देवत्त नगर, एच.व्ही.पी.एम. अमरावती, ता. जि. अमरावती, 5) नवनीत मंगेश मेहरे, वय-22 वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी रा. देवत्त नगर, एच. व्ही. पी. एम. अमरावती, ता. जि. अमरावती

विरुद्ध

गैरअर्जदार:- Nil

सर्वत्र लोकास सूचित करण्यात येते की, मयत **ताराबाई अंबादास मेहरे** के दि. 05-05-2024 रोजी अमरावती येथे मचत झाले. अर्जदार मेघा धनंजय मेहरे + 04 रा. वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत ताराबाई अंबादास मेहरे यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIR-SHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखलहिलेला आहे

त्यापेक्षा अर्जदार मेघा धनंजय मेहरे + ०४ वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत ताराबाई अंबादास मेहरे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

## जाहिरनामा / सायटेशन

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती

श्री. आर. व्ही. नडगडवल्ली, 3रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज 1659/2014
श्रीमती वनिता बिजवे व तीन वि. निरक
पुढील तारीत 12/11/2024

अर्जदार :- 1. Smt. Vanita Dnyaneshwar Bijwe Age 59 years, Occu: Household, 2. Shrikant Dnyaneshwar Bijwe Age 39 years, Occu: Business, 3. Kushal Dnyaneshwar Bijwe Age- 37 Years, Occu: Business, 4- Nikhil Dnyaneshwar Bijwe Age 32 Years, Occu: Business All R/o. Near MNP Hospital, Bhaji Bazar. Amravati, Tq.Dist. Amravati

विरुध्द

गैरअर्जदार :- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत Dnyaneshwar Tukaram Bijwe हे दि 04.04.2016 रोजी अमरावती येथे ममत झाली. अर्जदार श्रीमती वनिता ज्ञानेश्वर बिजवे व तीन यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हू मस्त यांचे वारसाचे प्रमाण मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज केलेला आहे

त्यापेक्षा श्रीमती वनिता ज्ञानेश्वर बिजवे व तीन वरीलप्रमाणे सदर्हू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर त्यांनी जाहीरनाम्याचे प्रसिद्धीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसदार प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २०.०८.२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

कोर्ट शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**